लोकमत

ल्यू ख्रिस्तोफर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ

# पर्यावरणपूरक संशोधनावर भर द्यावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जीवन सुखकर करण्यासाठी आपण जे संशोधन करीत आलो आहोत; त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालल्याचे चित्र आज निर्माण झाले आहे. असेच होत राहिले, तर मानवाचे अस्तित्व धोक्यात आल्याखेरीज राहणार नाही; त्यामुळे संशोधकांनीच आता ती जबाबदारी उचलून पर्यावरणपूरक संशोधनावर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन कॅनडाच्या लेकहेड विद्यापीठातील प्रा. ल्यू ख्रिस्तोफर यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील 'मटेरिअल्स व एन्व्हायर्नमेंट सायन्सेस' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र, संगणकशास्त्र आणि युसिक विभाग, श्री यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय (सोळांकूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर) यांच्यातर्फे ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत कॅनडासह ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेपाळ, तैवान, श्रीलंका, सौदी अरेबिया, आदी देशांतील संशोधक सहभागी आहेत.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन प्रा. ल्यू ख्रिस्तोफर आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी राहुल पाटील, सुबेदी, जी. जी. चौगुले, आर. वाय. पाटील, डी. जी. किल्लेदार, ए. वाय. पाटील, पी. एस. पाटील, आर. के. कामत, व्ही. एम. पाटील, आदी उपस्थित होते.

यावेळी ए. वाय. पाटील, आर. वाय. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, सोळांकूरचे प्राचार्य डॉ. जी. जी. चौगुले, आदी उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 4 Dec 08, 2018
Powered by: erelego.com



कोतोली : येथील समारोप समारंभाप्रसंग मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# चौगुले कॉलेजच्या विविध स्पर्धांचा समारोप

**कोतोली / प्रतिनिधी :**

यशस्वी विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे काम श्रीपतराव चौगुले महाविद्यालयाने केले आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. ते कोतोली (ता. पन्हाळा) येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचा २३ व्या वर्धापनदिनानिमित्त व श्रीपतराव चौगुले यांच्या सातव्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या विविध स्पर्धांच्या समारोप समारंभामध्ये बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. के. एस. चौगुले होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हा उच्च पदावर नेऊन ठेवायचे काम या कॉलेजने केले आहे; पण मोठ्या पदावर गेल्यानंतर मागच्या लोकांना विसरणे हे चुकीचे आहे.

चौगुले कॉलेजची नाळ ही सर्वसामान्य जनतेबरोबर जोडली गेली आहे. देशातील फक्त १८ टक्के मुले उच्च शिक्षण घेऊ शकतात; पण त्या १८ टक्के मुलांमध्ये या चौगुले कॉलेजचा विद्यार्थी आहे, याचा मला अभिमान आहे, असेही कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्रा. डॉ. डी. आर. मोरे, डॉ. के. एस. चौगुले, प्राचार्य भाऊसाहेब शेवाळे, प्रा. जे. के. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू प्रा. डॉ. शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सचिव शिवाजी पाटील, प्रा. डॉ. पी. ए. अत्तार, एम. एस. चौगुले यांच्यासह पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्तविक प्रा. इनामदार यांनी केले. प्रा. यू. पी. अत्तार यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात आंबेडकरांना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. जगन कराडे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. एम. टी. गोफणे, श्रीपाल गायकवाड, आनंद खामकर यांच्यासह अनेक शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.